# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.10.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या.**

पंतप्रधान नरेन्द्र मोदी आज धन्वंतरी दिनानिमित्त 12 हजार कोटींहून अधिक खर्चाच्या आरोग्यविषयक योजनांचा प्रारंभ करणार

बडोद्यामध्ये भारत आणि स्पेन यांच्यात विविध क्षेत्रातील सामंजस्य करारांवर स्वाक्षरी

महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व तर झारखंड विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस

भारतीय क्रिकेट संघाच्या आगामी दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी माजी क्रिकेटपटू व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांची प्रमुख प्रशिक्षक म्हणून नियुक्ती
आणि

भारत आणि न्यूझीलंड महिला क्रिकेट संघांदरम्यान मर्यादित षटकांचा अंतिम सामना आज अहमदाबादमध्ये

**धन्वंतरी योजना**
पंतप्रधान नरेन्द्र मोदी आज धन्वंतरी दिन आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आरोग्याशी संबंधित जवळपास 12 हजार 850 कोटी रुपयांच्या योजनांचा प्रारंभ करणार आहेत. 70 वर्षं आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान पंतप्रधान भारत जन आरोग्य योजनेत सामावून घेण्याच्या योजनेचीही ते आज सुरुवात करणार आहेत. यामुळे समाजाच्या सर्व वर्गातील ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होतील. याशिवाय पंतप्रधानांच्या हस्ते आरोग्य सेवा आणखी सुधारण्यासाठी विविध आरोग्य संस्थांचं उद्घाटन आणि पायाभरणीही करण्यात येणार आहे. देशातल्या पहिल्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या दुसऱ्या टप्प्याचंही ते उद्घाटन करणार आहेत. या टप्प्यात एक पंचकर्म रुग्णालय, एक क्रीडा वैद्यक संस्था, एक केंद्रीय वाचनालय, एक आयटी आणि स्टार्टअप इन्क्यूबेशन सेंटर आणि 500 खाटांच्या रुग्णालयाचा समावेश आहे. याव्यतिरिक्त विविध राज्यांमधल्या आरोग्याशी संबंधित इतर अनेक संस्था आणि उपक्रमांचाही ते दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ करतील. तसंच आजच्या 9 व्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था म्हणजेच एम्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमातही पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेक अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ करतील. यामध्ये दंतवैद्यक विज्ञान संशोधन आणि रेफरल संस्था, जनौषधी केंद्राचा समावेश आहे.

**भारत-स्पेन**
गुजरातमधील बडोदा इथं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेद्रो सांचेझ यांच्यातील शिष्टमंडळ स्तरावर झालेल्या बैठकीवेळी भारत आणि स्पेन यांच्यात रेल्वे वाहतूक, सीमाशुल्क, आणि गुंतवणुकीशी संबंधित सामंजस्य करार करण्यात

आले. तसंच 2026 हे वर्ष भारत-स्पेन यांच्यातलं सांस्कृतिक, पर्यटन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष म्हणून साजरं करण्यावरही दोन्ही देशांनी सहमती व्यक्त केली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी विविध द्विपक्षीय विषयांवर व्यापक चर्चा केली. शाश्वत ऊर्जा आणि हवामान बदलांशी जुळवून घेण्यासंदर्भात उभय देशांचं सहकार्य बळकट करण्यावरही एकमत झालं असल्याचं या चर्चेनंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. दोन्ही देशांमधला नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील सामंजस्य करारही लवकरात लवकर पूर्णत्वास आणण्यास उत्सुक असल्याचं दोन्ही नेत्यांनी सांगितलं.  त्यांनी दहशतवादाबद्दल चिंता व्यक्त केली, तसंच या समस्येला तोंड देण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या यादीतील अल कायदा, आयसिस, लष्करे तैयबा यासारख्या दहशतवादी गटाविरुद्ध समन्वयानं कारवाई करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

**रोजगारमेळा**

विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्यानं नियुक्त केलेल्या 51 हजारांहून  अधिक युवकांना आज पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरस्थ पद्धतीनं नियुक्ती पत्रांचं वितरण करणार आहेत. यासाठी देशभरातील 40 हून अधिक ठिकाणी रोजगार मेळाव्यांचं आयोजन करण्यात येणार आहे.

**सायबर गुन्हे**

दुसऱ्यांच्या बँक खात्यांचा वापर करून, अवैधरित्या पैशांचं हस्तांतरण करणाऱ्या प्रणालींविरुद्ध भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने सावधगिरी बाळगण्याचा इशारा  दिला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटित सायबर गुन्हेगार, हवाला व्यवहार आणि तत्सम अवैध आथिक व्यवहारांसाठी अशा बँक खात्यांचा वापर करतात. गुजरात आणि आंध्र प्रदेश पोलिसांनी अलीकडेच  टाकलेल्या छाप्यांमध्ये असे गुन्हे उघड झाले आहेत, असं गृह मंत्रालयाने म्हंटलं आहे.

**निवडणुका**

महाराष्ट्रात येत्या 20 नोव्हेंबरला होत असलेल्या विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. विविध राजकीय पक्षांच्या दिग्गज उमेदवारांनी काल आपापल्या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले. अनेक उमेदवारांनी यावेळी मिरवणूक काढत शक्तिप्रदर्शन केलं. 288 मतदारसंघांसाठी कालपर्यंत 3259 उमेदवारांचे 4426 अर्ज दाखल झाले आहेत अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे उमेदवार एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काढण्यात आलेल्या प्रचारफेरीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे सहभागी झाले होते.  ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून भाजपचे संजय केळकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी, तर याच मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र  पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**झारखंड**

झारखंड विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्याचं मतदानही येत्या 20 नोव्हेंबरला होत असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील 38 जागांसाठी  आतापर्यंत 632 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उद्या या अर्जांची छाननी होणार असून 1 नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येऊ शकतील. दरम्यान झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आता सुरू झाली आहे. त्याचवेळी अधिकाधिक प्रमाणात मतदान व्हावं यासाठी प्रशासनाकडून प्रोत्साहन देण्यात येत आहे.  याचाच एक भाग म्हणून राज्यातल्या 17 लाखांहून अधिक शाळकरी मुलांनी आपल्या पालकांना पत्र लिहून त्यांना मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन केलं. या मुलांनी, त्यांच्या मातापित्यांनी आणि पालकांनी #MummyPapaVoteDo या हॅशटॅगसह समाजमाध्यमांवर ही पत्रं सामायिक केली असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी के. रविकुमार यांनी सांगितलं.

**धनत्रयोदशी**

धनत्रयोदशीनिमित्त सोनं-चांदी खरेदी करताना ग्राहकांनी हॉलमार्कची खात्री करावी असं आवाहन भारतीय मानक ब्युरोनं केली आहे. धनत्रयोदशीला या  मौल्यवान धातूंची खरेदी करण्याची प्रथा आहे, त्या पार्श्र्वभूमीवर ग्राहकांना हॉलमार्क असलेल्या दागिन्यांचं महत्त्व पटवून देण्याचा उद्देश असल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**मेट्रोदुर्घटना**

बिहारमध्ये पाटणा मेट्रो रेल्वे प्रकल्पाचं काम सुरू असताना झालेल्या दुर्घटनेत दोन मजुरांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. भूमिगत मेट्रो मार्गासाठी खोदकाम सुरू असताना टनेल बोरिंग मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ही दुर्घटना घडली.

**केरळदुर्घटना**

केरळच्या कासारगोड जिल्ह्यात विरकावु अंजुत्तबलम या मंदिरात आयोजित आतषबाजीच्या कार्यक्रमावेळी झालेल्या भीषण स्फोटात  160 हून अधिक जण जखमी झाल्याचं वृत्त आताच हाती आलं आहे. या दुर्घटनेबाबत सविस्तर माहितीची प्रतीक्षा आहे.

**एकतादौड**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त दरवर्षी 31 ऑक्टोबरला आयोजित केली जाणारी एकता दौड यावर्षी दिवळीमुळे दोन दिवस आधीच म्हणजे आजच होत आहे. नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी काही वेळापूर्वी या एकता दौडला हिरवा झेंडा दाखवला. केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**हॉकी**

आगामी ‘आशियाई महिला हॉकी अजिंक्यपद स्पर्धा 2024’ साठी 18 खेळाडूंचा संघ जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी सलीमा टेटे संघाचं नेतृत्व करणार असून, नवनीत कौर  उपकर्णधार आहे.  बिहार मधील राजगीर हॉकी मैदानावर येत्या 11 ते 20 नोव्हेंबर दरम्यान या स्पर्धेतील सामने खेळले जाणार आहेत. स्पर्धेच्या उद्घाटनाच्या दिवशीच भारतीय संघाचा पहिला सामना मलेशिया संघाशी होणार आहे.

**क्रिकेट-महिला**

भारत आणि न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान मर्यादित षटकांच्या सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना आज अहमदाबादमध्ये होणार आहे. दोन्ही संघांनी आधीचे एक एक सामने जिंकून बरोबरी साधली असल्यामुळे आजचा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा दोन्ही संघ प्रयत्न करतील. सामना दुपारी दीड वाजता सुरू होईल.

**VVSलक्ष्मण**

भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या आगामी दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी माजी क्रिकेटपटू व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांची प्रमुख प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 8 ते 15 नोव्हेंबर या कालावधीत चार टी-20 सामने खेळणार आहे. विद्यमान राष्ट्रीय प्रशिक्षक, गौतम गंभीर  बॉर्डर-गावस्कर चषक स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाला जाणार असल्यामुळे लक्ष्मण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.